एस.सी.सी. ३६१/२०२४
सरकार वि. राजेंद्र नवले.
**निशाणी १२ सोबत**

**<u>अभियोगपक्षातर्फे सा.क्र. १ याची जबानी</u>**
**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,</u>**

माझे नाव – विजय बबन पांडे, वय – २९ वर्षे,
व्यवसाय – शेती, राहणार – कुंभेफळ,
तालुका – अकोले, जिल्हा – अहमदनगर.

**<u>सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

१. दिनांक ११.०७.२०२४ रोजी पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी बोलावले नव्हते. पोलीसांनी माझे समक्ष काहीही कार्यवाही केली नव्हती. माझी केवळ कागदावर सही घेतली होती. आता मला अभिलेखावरील घटनास्थळ जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकुराबाबत मला माहीती नाही. सहीस **निशाणी १५** देण्यात येते.

*(साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्यामुळे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास भारतीय साक्षीपुरावा कायदा कलम १५४ प्रमाणे उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)*

**<u>उलटतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. ए. भोसले यांच्या मार्फत</u> –**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ११.०७.२०२४ रोजी सायंकाळी ०७:३० वाजता पोलीसांनी मला इंदोरी गावच्या शिवरात ताज हॉटेलच्या आडोशाला बोलावले होते. हे म्हणणे खरे नाही की, तेथे एक इसम पिशवी घेवून उभा दिसला. हे म्हणणे खरे नाही की, त्यास जागीच पकडून त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव राजेंद्र भागवत नवले असल्याचे

एस.सी.सी. ३६१/२०२४
सरकार वि. राजेंद्र नवले.
**निशाणी १२ सोबत**

सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, त्याच्या पिशवीची झडती घेतली असता त्यामध्ये देशी बॉबी संत्रा च्या १८० मिलीच्या ६ सिलबंद बॉटल मिळून आल्या. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा मुद्देमाल पोलीसांनी माझ्या समक्ष जप्त केला. हे म्हणणे खरे नाही की, जप्त मुद्देमाला पैकी एक बाटली रासायनीक विश्लेषणाकरीता वेगळी काढून त्यावर माझ्या सहीचे कागदी लेबल लावले. हे म्हणणे खरे नाही की, त्याचा घटनास्थळ जप्ती पंचनामा माझ्या समक्ष तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, मी त्यावर वाचून सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझ्या ओळखीचा असल्यामुळे त्याला वाचवण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ श्री. वाय. एन. पांडे यांच्या मार्फत</u>**

उलटतपास नाकारला.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

ANANT RADHAKISHAN TENGSE
Digitally signed by ANANT RADHAKISHAN TENGSE
Date: 2026.01.19 17:57:00 +0530

दिनांक १९.०१.२०२६
अकोले

**( अनंत रा. टेंगसे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट नं. २, अकोले.